जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १२ दिनांक - ०४/०१/२०२४**

## सिंहगड रोड पो स्टे पुणे शहर

# सिंहगड रोड पोलिसांनी ॲटो रिक्षा चोरी करणा-या सराईत आरोपीस केली अटक

दिनांक २८/१२/२०२३ रोजी केदार अपार्टमेंट रेणुका नगरी जवळ वडगाव-बुद्रुक सिंहगड रोड,पुणे येथुन पार्किंगमधुन तीन चाकी ॲटो रिक्षा कोणी तरी अज्ञात चोरट्याने चोरी करुन घेवुन गेले बाबत सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा सिंहगड रोड पोलीस स्टेशऩचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे गुप्त बातमीदारांकडे तसेच सदर परिसरामधील पाहणी करुन अज्ञात आरोपीचा सखोल तपास करीत असताना, दि.३०/१२/२०२३ रोजी ते दि.३१/१२/२०२३ रोजीचे कालावधीत तपास पथकातील सहा.पोलीस उप निरी.आबा उत्तेकर,व स्टाप असे सिंहगड रोड पोलीस स्टेशऩ हद्दीत रेकॉर्डवरील आरोपी तसेच संशयीत इसम व गुन्हेयांना आळा घालण्यासाठी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिहगड रोड पो. स्टे. पुणे यांचे आदेशान्वये पोलीस स्टेशन हद्दीत कोंबिग ऑपरेशन करीत असताना,तपास पथकातील सहा.पोलीस उप-निरीक्षक,आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार,राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम प्रयोजा सिटी समोरील सर्व्हिस रोड येथे काळी-पिवळी रिक्षा घेवुन त्यामध्ये बसलेला आहे. सदरची रिक्षा ही त्याने चोरी केली असल्याची अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

सदरची बातमी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे यांना कळविली असता,त्यांनी सदर बातमीची खातरजमा करुन योग्य ती कायदेशिर कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सपोनि.सचिन निकम यांनी सोबतचा अंमलदार स्टाफ यांचे मदतीने मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी एक इसम काळ्या-पिवळ्या रिक्षामध्ये ड्रायव्हर सीटवरुन निघुन जाण्याचे तयारीत असताना दिसला,त्यास वरील स्टाफच्या मदतीने दि.३१/१२/२०२३ रोजी जागीच पकडुन त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **विशाल युवराज राऊत,वय-१९ वर्षे,रा.मु.पो.अंत्रोली, ता.वेल्हा,जि.पुणे** असे सांगितले. त्यांच्याकडे त्याचे ताब्यातील रिक्षा क्रमांक एमएच/१२/एनडब्ल्यु/९६२२ हीचे कागदपत्र व लायसन्सबाबत विचारता तो काही न बोलता तसाच शांत उभा राहिल्याने,त्याच्याकडे पुन्हा सदर रिक्षाबाबत विचारणा करता,त्याने सदरची रिक्षा ही चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यास दाखल गुन्ह्यात अटक करुन त्याच्याकडे अटक मुदतीत अधिक तपास करता त्याने कात्रज चौक,सर्प उद्यान कात्रज,पुणे या ठिकाणाहुन तीन चाकी रिक्षा चोरी केल्याचे सांगितले आहे. त्याचेकडुन एकुण २,५५,०००/- रुपये किंच्या तीन ॲटो रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. दाखल गुन्ह्याचा पुढील अधिक तपास सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे पोलीस उप-निरीक्षक, गणेश मोकाशी हे करीत आहेत. अटक आरोपी याचेकडुन सिंहगड रोड पो स्टे ०१, भारती विद्यापीठ पो स्टे ०२ असे ०३ गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त परीमंडळ-३,श्री.संभाजी कदम मा.सहा पोलीस आयुक्त,सिंहगड रोड विभाग,पुणे,श्री.अप्पासाहेब शेवाळे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.जयंत राजुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक,श्री.सचिन निकम, पोलीस उपनिरीक्षक,गणेश मोकाशी, पोलीस अंमलदार,आबा उत्तेकर, संजय शिंदे, राजु वेगरे, राहुल ओलेकर, सागर शेडगे, अमोल पाटील, शिवाजी क्षीरसागर, देवा चव्हाण, विकास पांडुळे, विकास बांदल, अविनाश कोंडे, दक्ष पाटील, स्वप्नील मगर यांचे पथकाने केली.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर
सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर